# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१२/०३/२०१९
## दि.११/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे १२३/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | अर्जुन कांबळे, पो.हवा. कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे शहर |
| **आरोपी** | एक इसम,वय-३१ वर्षे,रा.आळंदी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०३/२०१९ रोजी सकाळी ०७/१० वा.सर्किट हाऊसचे शेजारी विभागीय आयुक्त बंगल्या समोरील रोडवर पुणे येथे |
| **तपशिल** | कोरेगांव पार्क पो स्टे अ.मयत रजि.नं.०७/२०१९,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ॲटो रिक्षा ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,मोटार सायकलस्वार हमीद हुसेन शेख,वय-५५ वर्षे,रा.गल्ली नं.१,शिवनेरीनगर,कोंढवा-खुर्द,पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.जी.शेंडगे ८८८८९०२९०२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे २०५/१९,भादविक १४३,१४८,१४९,३२३,४२७,५०४,५०६,आर्म ॲक्ट ३(२५) |
| **फिर्यादी** | भरत तगरे,वय-३६,धंदा-पाणीपुरी,रा.हनुमाननगर,पुणे |
| **आरोपी** | एकुण सात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०३/२०१९ रोजी १८/१५ ते १८/३० वा.चे दरम्यान व्यंकटेश भेळ सेंटर,हनुमान नगर वडारवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी बेकायदेशीर जमाव जमवुन,कोयत्या सारखे हत्यार घेवुन येवुन,फिर्यादी यांचे भेळ सेंटरवरील गि-हाईकांना शिवीगाळ करून,दुकानाचे कांऊटरवर सिमेंटचे गट्टुने मारुन काचा फोडुन,पाणीपुरी रस्त्यावर फेकुन अंदाजे ७ ते ८ हजाराचे नुकसान करून,तेथील लोकांना मारहाण करुन,त्यांचे शेजारी लावलेल्या कारची काच फोडुन नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बालाजी मगर ९९२१४८०३६३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे १३७/१९,भादविक ४२०,३४ व औषधे प्रसाधने अधि.१९४० व नियम १९४५ क.१८(a),१८(ए)(vi),१८(a),२२(१)(cca),नियम १०४-a,६५(५)(१),६५(५)(३)(१),६५(६),६५(१६),२७(B॥), २७(D),28,28(a) |
| **फिर्यादी** | विवेक खेडकर,वय-३८,रा.बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | १.मे.शशांक फार्मा.सर्जिकल शॉपचे मालक २.रजि.फार्मासिस्ट (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०४/२०१८ ते दि.०२/०२/२०१९ रोजीपर्यंत मे.शशांक फार्मा.सर्जिकल शॉप नं.२,अपर ग्राऊंड फ्लोअर विश्व हाईट्स,१७९७,नं.१,सदाशिव पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद मे.शशांक फार्मा.सर्जिकल शॉपचे मालक व रजि.फार्मासिस्ट यांनी सदर कालावधी मध्ये संरक्षण दलातील सैनिकांसाठी व सरकारी रूग्णालयात उपचारासाठी येणारे गरीब गरजु रूग्णांसाठी असलेल्या औषधाची विक्री बाजारा मध्ये खुलेआम विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले असुन,औषधाचे खरेदी-विक्री बीलाचे तपशिलावरून असे निष्पन्न झाले आहे की,शासकीय वापरासाठी असणा-या औषधाची बेकायदेशीररित्या खरेदी विक्री करून शासनाची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. मधुकर साळुंके ९५५२८३५३९९ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे १६८/१९,भादविक ४०८,४०९ |
| **फिर्यादी** | महेश पावडे,वय-३४ वर्षे,रा.आंबेगाव-ब्रुद्रुक,पुणे |
| **आरोपी** | एक इसम,रा.वैभववाडी,गाडीतळ,हडपसर,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०२/२०१९ रोजी १०/११ वा. ते दि.१४/०२/२०१९ रोजी ११/०० वा.पर्यंत युनियन बँक टिळक रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची कंपनी विविध बॅंकेचे एटीएम मध्ये रोख रक्कम भरण्याचे व व्यवस्था पणाचे काम करणा-यावर देखरेख तसेच ऑडिट करण्याचे काम देखील पाहतात. त्यांची कंपनी शहरातील विविध बॅंकेतील एकुण ९५० ए.टी.एम. मशीनचे रोख रक्कम भरण्याचे व्यवस्थापन कपंनीतर्फे केले जाते. यातील नमुद इसमाने वेळोवेळी कंपनीतर्फे दिलेले रोख ३१,०३,३००/- रूपये रक्कम ए.टी.एम. मशीन मध्ये न भरता,त्याचा वेळोवेळी अपहार करून, फिर्यादी यांचे कंपनीचा व बॅंकेचा विश्वास संपादन करुन,सदरची रक्कम स्वतःचे फायदया साठी वापरुन,त्या रकमेचा अपहार करुन,बॅंकेची व कंपनीचा विश्र्वासघात केला आहे. (सदरचा गुन्हा तक्रारी अर्जावरून दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.सी.ऊजगांवकर ७३५०५४७००७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे १७१/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | अभिजीत गुप्ता,वय-२९ वर्षे,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल व पेटीएम खातेधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना ओएलक्स या साईटवर सॅमसंग नोट-८ या मोबाईलची जाहीरात आली होती. सदर सॅमसंग नोट-८ या मोबाईल विक्री करणा-या व्यक्तीशी संम्पर्क केला असता, यातील नमुद अज्ञात मोबाईल व पेटीएम खातेधारक यांनी ते इंडियन आर्मीशी निगडीत आहे असे सांगुन,मोबाईलचे पैसे ऑनलाईन पेमेंट करण्यास सांगुन,सदरचा मोबाईल हॅन्डसेट फिर्यादी यांना आर्मी कुरियर सर्व्हिसेसचे मार्फतीने पाठवितो असे सांगुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून,त्यांना १८,०००/- रुपये रक्कम टप्प्या-टप्याने ऑनलाईन भरण्यास सांगुन,फिर्यादी यांना मोबाईल हॅन्डसेट न देता,त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) अजय वाघमारे ९८२३८११६९६ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे २२४/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम,वय-३५,रा.कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०३/२०१९ रोजी सकाळी ०७/२३ ते ०७/२५ वा.चे दरम्यान दि इंडीयन इलेक्ट्रिक कंपनी प्रा.लिमी.कोंढवा-खुर्द,ता.हवेली,जि.पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुंद ठिकाणी कामावर हजर असताना,त्यांचे बॅंकेतील बचत खात्याचे बनावट एटीएम कार्ड तयार करून,कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे खात्यातुन तीन वेळा ट्रान्झेक्शन करून,फिर्यादी यांचे खात्यातुन एकुण १९,५००/- रूपये काढुन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. अनिल पाटील ९९२३७८६९९९ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे २२५/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३४,रा.कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०३/२०१९ रोजी पहाटे ०२/१९ वा. फिर्यादीचे राहते घरी कोंढवा-खुर्द,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरी असताना,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,फिर्यादी यांचे वानवडी शाखा येथील बँकेतील चालु खात्याचे बनावट एटीएम कार्ड तयार करून,वेग-वेगळी ट्रान्झेक्शन करून,फिर्यादी यांचे खात्या मधील एकुण ५० हजार रूपये काढुन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. अनिल पाटील ९९२३७८६९९९ |

## दि.१२/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे १६९/१९,भादविक ३०७ |
| **फिर्यादी** | सौ.नर्गिस असिफ नायब,वय-३९ वर्षे,रा.मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपी** | असिफ सत्तार नायब,वय-४० वर्षे,रा.मेहर क्लासिक,फ्लॅट नं १,तिसरा मजला,मार्केटयार्ड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०३/२०१९ रोजी १६/०० वा.फिर्यादी यांचे राहते घरी मेहर क्लासिक,फ्लॅट नं.१, तिसरा मजला,एन.के.आशियाना सोसायटी समोर मार्केटयार्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे राहते घरी बेडरुम मध्ये मोबाईल पाहत असताना,यातील नमुद इसम असिफ सत्तार नायब याने त्याचे हातातील कोयत्याने फिर्यादी यांना ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या डोक्यावर वार केला. त्यावेळी फिर्यादी यांनी तो वार हाताने आडविण्याचा प्रयत्न केला असता,फिर्यादी यांचे उजव्या हाताचा अंगठा तुटुन,डाव्या हाताच्या करंगळीच्या जवळील बोटास जखमी करुन,फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.सी.उसगावकर ७३५०५३७००७ |

**<u>प्रेसनोट</u>** दिनांक २५/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन ॲक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन ॲक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटांमध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रु व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

**<u>स्पर्धेसाठीचे नियम व अटी-</u>**

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिन्ह नसावे

२. दिनांक २५/०२/२०१९ रोजीची ही मुदत दि.१२/०३/२०१९ पर्यंत वाढविली असुन दि.१२/०३/२०१९ पर्यंत प्रवेशिका व फोटो नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील

३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरू शकतील.

४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.

५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.

६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.

७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

<u>अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-</u>

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६



# Police in Action

for **SERVICE** & **SECURITY** of People

**PHOTO CONTEST!**

Extended ... to 12 March 2019

TO TAKE PART & KNOW MORE, GO TO

WWW.PIXLENT.COM/PUNEPOLICEPHOTOCONTEST

महाराष्ट्र पोलीस Pune Police

# Police in Action

## for Service & Security of People

महाराष्ट्र पोलीस Pune Police



### Photography Contest!

Open to All!

Participate, in one of three groups:

1. **Amateur/ Hobby Photographers**
2. **Police officers, staff & members of their families**
3. **Press/ Professional Photographers**

Prizes in each Group!

1st: **Rs. 5,000**

2nd: **Rs. 3,000**

3rd: **Rs. 2,000**

Two more consolation prizes

**Entry Free!**

Last Date Extended ...

**12 March 2019**

To take part & know more, go to

**www.pixlent.com/punepolicephotocontest**

जनसंपर्क अधिकारी,

पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर